# महात्मा फुले कृषी विद्यापीठ
## कृषी हवामानशास्त्र विभाग
### कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५

विभाग प्रमुख : डॉ.डी.एस.पोखरकर फोन : २५५३८००९


## हवामानावर आधारीत कृषि संदेश
### ग्रामीण कृषि मौसम सेवा
### पुणे

दिनांक: २४.१०.२०१७

**मागील आठवड्याचे हवामान** : पुणे परिसरात मागील आठवड्यात कमाल तापमान २९.९ ते ३२.९ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १६.७ ते २१.९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८४ ते ९७ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३० ते ६१ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०.५ ते ५.१ कि.मी. होता, बाष्पीभवनाचा वेग ०.० ते ४.५ मि.मी. प्रति दिन होता. प्रखर सुर्यप्रकाशाचे तास ०.२ ते ९.१ प्रति दिवस होते. मागील आठवडयात १९.२ मिमी इतका पाऊस झाला.

**हवामान अंदाज** : या आठवडयात पुणे जिल्हयात कमाल तापमान ३१.० ते ३२.० अंश सेल्सिअसचे दरम्यान राहील तर किमान तापमान १८.० ते १९.० अंश सेल्सिअसचे दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७६ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ४२ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ४ ते ६ किलोमीटर दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा दक्षिणेकडून उत्तरेकडे राहील.

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

जिल्ह्यात पुढील ४८ तासात हवामान कोरडे राहून त्यापुढील ३ दिवसामध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे पाऊस पडण्याची शक्यता असल्याने पक्व झालेल्या सोयाबीन, बाजरी व इतर खरिप पिकाची काढणी पावसाची उघडीप पाहून करावी व त्याची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. जिल्ह्यात पावसाची शक्यता लक्षात घेता पावसाचे अतिरिक्त पाणी शेतात साठून राहणार नाही ह्याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. शक्यातो रब्बी हंगामातील पिकांची पेरणी जमिनीतील ओल्याव्यानुसार (वापसा) नुसार करावी.

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **गहू** | पेरणी | गहू पिकाचे पेरणीसाठी जमिनीची पूर्व मशागत करून शेत तणमुक्त ठेवावे. उत्पादनातील घट टाळण्यासाठी बागायती गव्हाची पेरणी १ नोव्हेंबर नंतरच करावी. |
| **कांदा** | लागवड | रांगडा कांदा लागवड ऑक्टोबर अखेर पुर्ण करावी. यासाठी बसंवत ७८०, फुले समर्थ व N-2-4-1 या वाणांचा वापर करावा. बियाण्यास अझोस्पिरिलम व स्फुरद विरघळणारे जीवाणु यांची प्रत्येकी २५ ग्रॅम प्रती किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. |
| **बटाटा** | लागवड | रब्बी हंगामातील बटाटाची लागवड करण्यापुर्वी बटाटा बियाणे इमिडाक्लोप्रिड २०० एस एल ०.०४ टक्के, ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात १० मिनिटे बुडवून त्यानंतर २.५ किलो अॅझोटोबॅक्टर १०० लिटर पाण्यात मिसळून ३० मिनीटे बिजप्रक्रिया करावी. |
| **टोमॅटो** | लागवड | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे टोमॅटोवरील करपा रोगाचे नियंत्रणासाठी मॅकोझेब २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **सोयाबीन** | काढणी | पाऊस पडण्याची शक्यता असल्याने पक्व झालेल्या सोयाबीन पिकाची काढणी पावसाची उघडीप पाहून करावी व त्याची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी व दाण्यांमध्ये ओलाव्याचे प्रमाण १२ % पेक्षा कमी ठेवावे. |
| **भात** | पिक | भाताच्या बुरशीजन्य करपा व जिवाणुजन्य कडाकरपा यांचे नियंत्रणासाठी कॉपर |

| | | |
|---|---|---|
| | वाढीची अवस्था | ऑक्झीक्लोराईड ५०० ग्रॅम व स्पेट्रोसायक्लीन ३० ग्रॅम २०० लिटर पाण्यातून एक एकर क्षेत्रावर फवारावे. ज्या भागात जिवाणुजन्य कडाकरपा जास्त आहे तेथे स्पेट्रोमायसीन सल्फेट ९०% + टेट्रासायक्लीन हायक्लोराईड १०%, १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **कापुस :** | पिक वाढीची अवस्था | कपाशीवरील शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी फेनवरलेट २० ईसी १० मिली किंवा सायपरमेथ्रीन १० ईसी १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **हरभरा :** | पेरणी अवस्था | जमिनीतील ओलावा कमी होण्यापुर्वी योग्य वापस्यावर हरभरा पिकाची पेरणी करावी. पेरणीसाठी दिग्विजय, विजय, जॅकी ९२१८ या जातीचा वापर करावा. बियाण्यास थायरम किंवा बाविस्टीन २ ग्रॅम प्रति किलो व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो प्रक्रिया करावी. त्यानंतर रायझोबियम २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून चोळावे. हरभरा पिकांची पेरणी करताना पक्षी थांबा म्हणून ज्वारीच्या दाण्याचा उतवडा करावा. |
| **करडई :** | पेरणी अवस्था | करडईची पेरणी जमिनीतील योग्य वापस्यावर करावी. बागायत करडईची पेरणी ऑक्टोंबर अखेरपर्यंत पूर्ण करावी. बीयाण्यास थायरम किंवा कॅप्टन किंवा बावीस्टीन २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी तसेच अॅझोटोबॅक्टर किंवा अॅझोस्पिरीलम २५० ग्रॅम + पी.एस.बी. कल्चर २५० ग्रॅम प्रति १० ते १५ किलो बियाण्यास चोळावे |
| **तुर :** | फुलोरा व शेंगा भरण्याची अवस्था | तुरीमधील फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी/पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतरपिक असल्यास किडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते .एच.एन.पी.व्ही (HNPV) य़ा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा .फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५% दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील (HNPV) ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तूर पिकावरील शेंगमाशी, पाने गुंडाळणारी अळी व शेंगा पोखरणारी अळींचे नियंत्रणासाठी डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिलि किंवा मेटरायझियम अॅनिसोप्ली हे जैविक बुरशीयुक्त किडनाशक २ मिलि प्रति लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काकडी व वेलवर्गीय भाजीपाला पिके :** | पिक वाढीची अवस्था | वेलवर्गीय भाजीपालामधील फळमाशी किडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी १५ ते २० क्युलुरचे गंध सापळ्याचा वापर करावा. काकडी व वेलवर्गीय भाजीपाला पिकावरील केवडा या रोगाच्या नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील ८ % + मॅन्कोझेब ६४ %, हे संयुक्त बुरशीनाशक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | अतिरिक्त हिरव्या चाऱ्यापासुन मुरघास बनवावा म्हणजे वर्षातील उरलेल्या ७ ते ८ महिन्यात हिरव्या चाऱ्याची कमतरता भासणार नाही. जनावरांना लाळ – खुरकत या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात प्रतिबंधक लस टोचावी. गोचीड –माशा वगैरे मुळे विविध रोगांचा प्रसार होत असल्यामुळे गोठे स्वच्छ ठेवावेत व जनावरांच्या अंगावर गोचीड प्रतिबंधक पावडर लावावी. जनावर व गोठ्यामध्ये डेल्टामेथ्रीन १२.५० टक्के, सायपरमेथ्रीन १०० इसी औषधे चाऱ्याव्यतिरिक्त जागेवर काळजीपूर्वक फवारावीत. या कालावधीत जनावरांना विविध आजार होत असल्यामुळे जनावरांचे गोठे वेळोवेळी धुवावेत व स्वच्छ ठेवावेत, भरपूर उजेड व हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. रोगी जनावर अलग ठेवावे, रोगी जनावराचे मलमूत्र दूर नेऊन पूरून टाकावे. सर्व जनावरांना पिण्यास नेहमी स्वच्छ पाणी द्यावे. जनावरांना हिरवा चारा जास्त प्रमाणात देवू नये यामुळे जनावरास पोटफुगीचा त्रास होणेची शक्यता असते. जनावरांना योग्य प्रमाणात उर्जा मिळणेसाठी कोरडा चारा व खुराक योग्य प्रमाणात द्यावा. |